# आधुनिकीकरणाचा आंध आदिवासी जीवनावरील प्रभाव

**डॉ. आर. वाघडव**
समाजशास्त्र, विभागप्रमुख
विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

★★★

**प्रस्तावनाः**— आंध आदिवासी जमात भारतात महाराष्ट्रासह तेलंगबाणी, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेशात आढळते— हसन यांच्या मते, आंध जमात ही गोंड आदिवासी जमातीची शाखा आहे— त्या त्या भागातील प्रबळ जातींच्या प्रभावामुळे ते मूळ समाजापासून वेगळे झालेले आहेत. महाराष्ट्रात मराठा समाजाच्या संपर्कात आल्यावर त्यांनी त्यांच्या रुढी, परंपरा आणि भाषेत मराठा लोकांप्रमाणे बदल केलेला दिसतो. आंध हे स्वतःला सातवाहन शरीराचे वंशज मानतात. सातवाहनाच्या काळात ही जमात जमीन जंगलाची मालक होती— सातवाहन राजाच्या मृत्यूनंतर ब्रिटीशांनी जमीन आणि जंगले आपल्या ताब्यात घेतली म्हणूनच आंध ही जमात मागासलेली राहिलेली दिसते. महाराष्ट्रात आंध ही जमात मराठवाडा आणि विदर्भात विखुरलेली आहे. भारतीय संस्कृती कोणात आंध ही एक विदर्भातील शेतकरी जमात असल्याचा उल्लेख आलेला आहे. परंतू बहुतांश आंध जमातीच्या लोकांकडे कोरडवाहू जमीन असून ते अल्पभूधारक आहेत. ही जमात मूळ आंध्रातील आहे असे अनुमान काढले जाते कारण आंध्रप्रदेशातही त्यांची बरीच वस्ती आहे. आंध्र प्रदेशातील आदिलाबादची सीमा महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयाला लागुन आहे. उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने अनेक आंध कुटुंबीय महाराष्ट्रात स्थलांतरीत झाली असून मराठवाडा प्रदेश व परभणी आणि नांदेड जिल्हयांमध्ये आंध जमातीची संख्या अधिक असल्याचे दिसून येते. 2011 च्या जगणना अहवालानुसार महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या ही 4,74,110 इतकी असलेली दिसते. महाराष्ट्रातील परभणी, नांदेड, यवतमाळ, हिंगोली व अकोला जिल्हयात आंध जमातीचे लोक मोठ्या **प्रमाणात आढळतात** — परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. मानवी समाज देखील परिवर्तनशील आहे. परिवर्तनाची गती समाजपरत्वे वेगवेगळी असू शकेल मा. परिवर्तन नाही असा समाज पृथ्वीतलावर अस्तीत्वात नाही. समाजाची संरचना ही आर्थिक संबंधांनी निर्मित असते. औद्योगिक क्रांतीमुळे समाजाची आर्थिक संबंधांची व्यवस्था बदलल्यामुळेच समाजात परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झाली आहे. आदिवासी समाजात देखील आधुनिक समाजाच्या प्रभावामुळे परिवर्तन घडून येत असून महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमात देखील त्याला अपवाद नाही. आंध आदिवासी जमातीतील परिवर्तनाचे स्वरूप विशद करणे हा या शोध निबंधाचा प्रमुख उद्देश आहे—

**आंध समाज व संस्कृती** :— आंध ही ,क प्राचीन आदिवासी जमात आहे. प्राचीन काळापासून या जमातीची समृध्द अशी सांस्कृतिक परंपरा आहे. मात्र आधुनिक समाजाच्या संपर्काने ही संस्कृती लोप पावत चालली आहे. पारंपारिक लोकनाट्या, विधिनाट्यो, लोकनृत्ये, दिंडार, लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्य प्रचार, उखाणे, वाद्य, संगीत या माध्यमातून आंध संस्कृती टिकून आहे. आंध जमातीचे दोन प्रकार पडतात. 'वरताती' म्हणजे वरचे अथवा उच्च आणि 'खालताती' म्हणजे खालचे आंध होय. या दोन टात विवाह संबंध होत नाहीत. आंध्र प्रदेशातील आंध लोक तेलगु भाषा बोलतात तर महाराष्ट्रातील आंध मराठी भाषेचा वापर करतात. हे लोक मध्यम ते कमी उंचीचे, पसरट नाक आणि चेहऱ्याची ठेवण असलेले आहेत. ही जमात मांसाहारी असून मराठी लोकांच्या संपर्कात आल्याने काही आंध आज संपूर्णतः माळकरी आणि शाकाहारी झाले आहेत.

आंध लोकांचे आडनावावरून बरेच समूह तयार होतात. उदा. बनसाले, डुकरे, नटकर, मगरे, मिटकरी, वाघमारे वगैरे आंध लोकांचे घर दगड मातीचे आणि काही प्रमाणात झोपडीवजा असते. परंतु आता शासकीय योजनांमधून त्यांना पक्के घरकूल मिळत आहे. आंध जमातीमध्ये छोटे शक्यतो दोन खोल्यांचे घर असते. घराभोवती लाकडी काटक्यांनी बनवलेले कुंपण असते. या कुंपणात पशुधन ठेवले जाते. काही घरे वाड्याप्रमाणे असतात. आंध लोकांचा पेहेराव हा मराठी लोकांप्रमाणे असतो. पुरुष धोतर बंडी घालतात, तर स्त्रिया साडी आणि चोळी परिधान करतात. आंध लोकांमध्ये मराठी लोकांप्रमाणे दागीणे वापरतात. शेती हा आंधांचा मुख्य व्यवसाय असून महादेव, खंडोबा, मसाई, मुंजा आणि स्थानिक देवतांची पूजा ते लोक करतात. आखाडी, गुढीपाडवा, नागपंचमी, होळी, पोळा, शिवरात्री हे त्यांचे प्रमुख सण आहेत. आंध जमातीचा हिंदू धर्माशी संपर्क वाढल्याने आपल्या मूळ संस्कृतीपासून हे लोक विचलित झालेले असून या जमातीत सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झालेली आहे. या परिवर्तनाचा आढावा संशोधकाने खालील मुद्यांव्दारे घेतला आहे.

**कुटुंब संस्थेतील परिवर्तन** :— आंध जमातीत पूर्वी संयुक्त कुटुंब पध्दती अस्तीत्वात होती. आज आधुनिकी करणाच्या प्रक्रियेच्या प्रभावातून व्यक्तीवादी दृष्टीकोन या जमातीत वाढला असून विभक्त कुटुंबाचे प्रमाण या जमातीत वाढते आहे. आंध जमातीच्या कुटुंब संस्थेतील बदलाचा आढावा शिंदे पंडित (2001) यांनी आपल्या संशोधनातून घेतला आहे. आज आंध लोकांचा आपल्या कुटुंबाचा आकार हा लहान ठेवण्याकडे कल आहे. कुटुंबात लिंगाधारीत श्रमविभागणी झालेली दिसून येते. कुटुंबात प्रामुख्याने पुरुष प्रधान संस्कृती असते मात्र कुटुंबातील महत्वाच्या निर्णय प्रसंगी महिलांची मते देखील विचारात घेतली जातात. अपत्य संगोपनात कुटुंबातील सर्व सदस्य सहभागी असतात. पूर्वीपासून चालत आलेली आप्तसंबंध व्यवस्था व कुलपध्दती आजही आंध जमातीत कायम आहे. सर्व समान वंश परंपरा मानणारे परस्परांच्या सुख दुःखात सहभागी होतात. अपत्यांच्या

शिवाजी बाबत हे लोक अधिक जागृक असल्याचे दिसतात. आधुनिकतेचा प्रभाव मान्य करावा लागतो.

**विवाह प्रथेतील परिवर्तन** :— आंध जमात प्रामुख्याने अंतर्विवाही आहे. विवाहासाठी जोडीदार निवडीसाठी आपल्याच जमातीतील व्यक्तीला प्राधान्य दिले जाते. मात्र समान आडनाव किंवा रक्त संबंधीत सदस्यात विवाह केले जात नाहीत. आंध ही जमातीत वरताती व खालताती या दोन गटात विवाह करणे निशिध्द मानले जाते. दोन्ही गटातील आंध लोक विवाह समारंभादी प्रसंगी परस्परांना आंमत्रित करतात मात्र बेटी व्यवहार करीत नाहीत. विधवा पूनर्विवाहाला मात्र मान्यता दिसत. पूर्वी घरातील जेष्ठ लोकच मुलांच्या विवाहासंबंधीचा निर्णय शेत होते मात्र आता विवाह प्रसंगी वर वधूची पसंती विचारात घेतली जाते. शिवाय आज आंध जमातीत हुंडा प्रथा देखील वाढली आहे. आज या जमातीत शिवाजीच्या प्रभावामुळे क्वचित प्रसंगी आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत.

**धार्मिक श्रध्दा व संस्कृतीमधील परिवर्तन**:— आदिवासी समाजाचा नेहमीच इतर धार्मिक प्रवाहांशी संबंध आलेला आहे. केवळ धार्मिक प्रवाहच नाहीत तर स्थानिक प्रवाहांशी त्यांचा संपर्क राहिलेला आहे. इतर धर्मियांकडून त्यांनी काही बाबीच केवळ स्वीकारलेल्या नाहीत तर इतर समाजावर देखील काही प्रमाणात आदिवासींचा प्रभाव पडलेला आहे. हिंदू धर्मातील जाती संस्थेशी आदिवासी समाजाचा सर्वात अधिक संबंध आल्याचे ,म. ,न. श्रीनिवास यांना आढळून आले आहे. आदिवासींनी हिंदूधर्मियांकडून काही धार्मिक प्रथा देखील स्वीकारलेल्या आहेत. आदिवासी प्रामुख्याने निसर्ग पूजक आहेत मात्र हिंदू धर्माच्या प्रभावामुळे त्यांनी हिंदू देव देवतांचा देखील त्यांनी स्वीकार केला आहे. आंध जमातीच्या बाबतीत ही जमात हिंदू की अहिंदू हा वाद कायम राहिलेला आहे. हिंदू धर्माच्या संपर्कात आल्याने हिंदू संस्कृतीचा प्रभाव आंध जमातीवर अधिक पडलेला दिसतो. मूलतः आंध जमातीची संस्कृती, आचार विचार, खानपान, परंपरा यांचे अवलोकन करता असे दिसते की यांची संस्कष्ती अन्य समाजापेक्षा भिन्न आहे. आंध जमात निसर्ग पूजक आहे. ते जंगलातील वर्ष, प्राणी, जल, अग्नी, आकाश यांना देव मानतात त्यांची उपासना करतात. त्यांचे संपूर्ण जीवन निसर्गाच्या सानिध्यात व्यतीत होत असल्याने निसर्गातील अलौकीक शक्तीची उपासना करणे ते आवश्यक मानतात. देवी देवतांची पूजा नैवेद्य देऊन दाखवून करण्याची परंपरा होती. नवस फेडताना बोकड किंवा कोंबड्याचा बळी दिला जात होता. आज आंध जमातीच्या धार्मिक जीवनावर हिंदू धर्माचा प्रभाव अधिक असल्याचे जाणवते. आज आंध समुदायातील देवी देवतांबरोबरच राम, कृष्ण, गणपती, विशू विठ्ठल—रूखमाई अशा देवी देवतांचीही पूजा केली जाते. त्याच बरोबर साईबाबा, गजानन महाराज यांच्यावरही त्यांची श्रध्दा दिसते. आज पूजा पध्दती मध्ये बळी देऊन पूजा करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. पूजा आणि नवस आता साध्या पध्दतीने केली जातात. आज आंध लोक काशी, प्रयोग, मथुरा, नाशिक, केदारनाथ, बद्रीनाथ, तिरूपती येथील बालाजी, शेगाव, शनिशिंगणापूर अशा हिंदू धार्मिक स्थळांना भेटी देतात. आंध जमातीत हिंदू सणवार, उत्सव साजरे केले जातात. संक्रांत सणाला हिंदू स्त्री प्रमणेच आंध स्त्री देखील वण देते व राखी पौर्णिमेला भावाला बहिणी राखी बांधतात, पूर्वी राखी बांधली जात नव्हती. हिंदू धर्मातील सण उत्सवांचे अनुकरण आंध जमातीतील महिलांनी केलेले दिसते. आंध जमातीतील सण व उत्सव प्रसंगातील गाणी मात्र हिंदूपेक्षा वेगळी असलेली दिसतात. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध धार्मिक संस्कार पूर्वीप्रमाणेच काटेकोर पेक्षा केले जात असल्याचे दिसून येते. आदिवासी समाज अज्ञान आणि अंधश्रध्देच्या प्रभावाखाली आहे. बहुतांश आदिवासी जमातीत आजारपणात पारंपारिक उपचार केले जातात. आंध आदिवासी जमातीतही पूर्वी आजार दूर कर. यासाठी नवस सायास केले जात होते. आज आधुनिक उपचार पध्दतीमुळे देवी देवतांवरील विश्वास कमी झाला असून आजार ठिक होण्यासाठी नवस केले जात नाही तर आधुनिक उपचार घेतले जातात.

आदिवासी जमातींचे वस्त्रालंकार देखील पारंपारिक आणी वैशिष्ट्यापूर्ण दिसतात. आदिवासी जमातीत प्रामुख्याने अगदी मोजके कपडे अंगावर परिधान केले जात होती. मात्र आज इतर आदिवासी स्त्री पुरूषांप्रमाणेच आंध आदिवासी स्त्री पुरूषांच्या पारंपारिक वस्त्राभषणांमध्ये देखील बदल झाला आहे. महिला आज साळी व ब्लाऊज वापरतात तर बहुतांश पुरूष देखील धोतर, सदरा,ऐवजी आधुनिक पॅन्ट, शर्ट परिधान करतात. आंध तरूण आधुनिक फॅशनप्रमाणे केशभुषा करतात.

**दिंडार नृत्य नाट्याचे बदलते स्वरूप** :— दिंडार हे आंध जमातीसाठी मनोरंजनाचे माध्यम असून तो त्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पूर्वी दिंडारामध्ये पौराणिक कथा घेऊन दिंडार केला जात होता. आज पौराणिक कथोंवजी वर्तमान समाजातील व्यंगांवर बोट ठेऊन दिंडार केला जातो. पेक्षकांना खिळवून ठेव. यासाठी हास्य विनोद केले जातात. आज दिंडारात चित्रपट गाण्यांच्या चालीवर अभंग, गौळणी म्हटल्या जातात. आधुनिक मनोजंनाची साधणे आणि संस्कृतीचा हा प्रभाव आहे असे म्हणता येईल. आंधाच्या दिंडार या नृत्यनाट्याचे झालेले हे रूपांतरण संस्कृतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करते.

**शेती पध्दतीत परिवर्तन** :— शेती हा आंध लोकांचा पारंपारिक आणि प्रमुख व्यवसाय आहे, तर पशुपालन, शिकार आणि सरपण गोळा करणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय आहेत. आंध जमातीतील लोक मोठ्या प्रमाणात लोक रोजंदारीवर काम करतात. डिंक संकलन व तेंदूपत्ता गोळा करण्याचे कामही करतात. आज काही आंध लोक दुसऱ्याची शेती कसणे, त्याचबरोबर शेती विभागून ती कसणे अशा प्रकारची कामे करतात. तर औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे आज बरेच आंध कुटुंबीय शहरात असंघटीत क्षेत्रात, बिल्डींग कन्स्ट्रक्शनमध्ये मजूर म्हणून काम करत आहेत. बरेच आंध लोक आज सरकारी खात्यात लेखनिक तसेच शिक्षक म्हणूनही काम करू लागले आहेत.

कृशी व्यवसाय संबंधित धार्मिक विधीत बदल झाला आहे. आता पेरणी, पीक काढणी अशा वेळी पूजा अर्चा क्वचितच केली जाते.

कारण आज लाकडी अवजारे क्वचितच दिसतात. शासकीय योजनांच्या लाभान्वये अनेक आंध लोकांना लोखंडी अवजारे मिळालेली आहेत. शिवाय आधुनिक मळणीयंत्र देखील मिळाले असून धार्मिक विधी, पूजा अर्चा यांचे प्रमण कमी झालेले दिसते.

**शिक्षणामुळे झालेला बदल** :— शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळेच नवीन कौशल्ये आत्मसात केली जातात व त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात. स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी शासन व्यवस्था स्वीकारल्यामुळे सर्वांचे हित साधणे व सर्वांचा विकास घडवून आणलो शासनाचे कर्तव्य मानले गेले. त्यामुळे संविधानातच समाजातील इतर मागास घटकांबरोबरच अनुसूचित जमातीच्या लोकांनाही शिक्षण घेता यावे यासाठी काही तरतूदी केलेल्या दिसतात. संविधानातील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतीगृहे, आरक्षण, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, स्वयंरोजगार प्रशिक्षण अशा अनेक तरतूदी केलेल्या दिसतात त्याचाच लाभ घेतल्याने आंध जमातीत परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झाली आहे.

**राजकीय बदलाचे स्वरूप** :— आंध जमातीत पूर्वी जमात पंचायत प्रचलित होती. आंधांच्या परंपरागत जात पंचायतीचे प्रमुख पद हे जमातीतील जेष्ठ व्यक्तीकडे असते त्यास 'मोहतरिया' असे म्हणतात. जमात पंचायतीत पाच वा सात पंच असत. त्यातही वृध्द, अनुभवी लोकांना स्थान दिले जात होते. जमात पंचायतीत स्त्रियांचा सहभाग नव्हता. आंध जमातीतील भांडण, तंटे, मतभेद आणि इतर गुन्हे सोडविण्याचे काम ही पंचायत करीत होती. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या राजकीय विकासासाठी लोकसभा, विधानसभा यातून आपले प्रतिनिधी पाठविता यावे यासाठी जागा राखून ठेवल्या आहेत. तसेच स्थानिक राजकारणातही सहभाग घेता यावा यासाठी पंचायत संस्थांमध्ये देखील आरक्षण देण्यात आले आहे. या आरक्षणाचा फायदा घेत आंध आदिवासी जमातीतून काही राजकीय नेतष्त्व उदयास आलेले दिसते. मात्र प्रभावी राजकीय नेतृत्वाच्या अभावामुळे राजकीय विकास साधता आलेला नाही. लोकसंख्या मुळात कमी असल्याने राजकीयदृष्टयाा ही जमात उपेक्षित राहिलेली आहे. तरीही जमातीमधील काही राजकीय नेतृत्वाने प्रभावी काम केल्याने त्याचा राजकीय फायदा आंध आदिवासी जमातीला झालेला दिसतो. कै. ॲड. गोविंदराव बुचके हे आंध जमातीतील पहिले विधान परिषद सदस्य होते. ॲड. शिवाजीराव माघे महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री राहिलेले आहेत. तसेच किशनराव पाचपुते, आमदार इंगळे, डॉ. संतोष टारफे हे देखील विधानसभेचे सदस्य राहिलेले आहेत. आज आंध तरूण पीढी राजकीय क्षेत्रात येऊ लागली आहे. मात्र शिक्षणाचा अभाव व नवीन आचार विचारांशी समायोजन करण्याची जमातीची अल्प मानसिकता यामुळे या जमातीच्या राजकीयकरणाची गती मंद आहे. आज राजकीय आरक्षणाचा फायदा घेत आंध आदिवासी महिला देखील राजकारणात सक्रीय होत आहेत. परंतु आंध जमातीमधील कजूटीच्या अभावामुळे व इतर राजकीय नेतृत्वाच्या खेळीमुळे आंध जमातीमधील नेतृत्व कमकुवत होत आहे. परिणामी आंध जमातीमधील विधानसभा सदस्य निवडणूकीत पराजित होत आहेत. हे प्रमुख राजकीय परिवर्तन आंध जमातीत दिसून येत आहे. तेलंगाणा राज्यातही आंध आदिवासींची संख्या कमी असल्याने त्या राज्यातही या जमातीला राजकीय विजनवास भोगावा लागत आहे. राजकीय आरक्षणाचा फायदा घेत राज्यातील दसनापूर गावातील आंध जमातीतील शोभाबाई पोटे यांची इंदर्वेल्ली मंडळ परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. शोभाबाई पोटे या त्यांच्या जमातीतील पहिल्याच लोकप्रतिनिधी ठरल्या. अशा प्रकारे राजकीय आरक्षण आणि थोड्या प्रमाणात होत असलेली राजकीय जाणीव जागृती यामुळे आंध जमातीत राजकीय परिवर्तन देखील मूळ धरू लागले आहे.

**सारांष** :— आदिवासी समाज आज सभ्य समाज संस्कृतीच्या प्रभावापासून अलिप्त राहिलेला नाही. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय आणि अशासकीय स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात असल्याने या समाजात परिवर्तन होणे क्रमप्राप्त आहे. आंध जमातही त्याला अपवाद नाही. औद्योगिकीकरण, आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे या जमातीच्या कुटुंब, धर्म, विवाह संस्थेत बदल झाला असून राजकीय आरक्षणामुळे राजकीय विकासही शक्य झाला आहे. कुटुंब कल्याण तसेच आधुनिक वैद्यकीय सेवा सुविधा याबाबत आंध जागृरूक झालेले आहेत. रोजगार योजना, वीज प्रकल्प, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा इत्यादींमुळे आंध समाजाचे जीवनमान सुधारत आहे. महाराष्ट्रात आंध जमातीतील लोकांनी हिंदू धर्मातील अनेक प्रथा परंपरांचे अनुकरण करून त्या आत्मसात केलेल्या दिसतात. त्यामुळे आदिवासी आणि हिंदू धर्मीय अशी मिश्र संस्कृती उदयास येत आहे.

## संदर्भ सूची


1 *कुलकर्णी, शौनक— (2009)— 'महाराष्ट्रातील आदिवासी' पुणे डायमंड पब्लिकेशन्स, पृ.क्र.12*

2 *https://en-wikipedia-org/wiki/Andh*

3 *जोशी, महोदव शास्त्री (संपा.) (1982) भारतीय संस्कृती कोश, खंड.1, पुणे भारतीय संस्कृती कोश मंडळ, पृ 32*

4 *http://censusindia-com, 2011*

5 *कुलकर्णी, शौनक (2009) उपरोक्त, पृ क्र. 12.13*

6 *शिंदे, पंडित (2001) 'मराठवाड्यातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास' डॉ— बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पी,च डी (समाजशास्त्र) पदवीसाठी सादर कर.यात आलेला प्रबंध, पृ. क्र. 123—125*

7. *धनजकर, राजेश. (2012) 'आंध समाजः शोध आणि बोध' नांदेड अनुराधा पब्लिकेशन, पृ.क्र 10*

8 *Srinivas] M-N-1952 Religion and Society among the Coorgs of South India Ûford: Clarendon Press*

9 *Srivastav Vinay kumar-2010 Social & economic Characteristics of Tribal ommunities That Call Themselves Hindu Working Paper Series, Vol- 01, No- 03, New Delhi: Indian Institute of Dalit Studies] p-5*